# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १२० वा ❑ शनिवार दि.२१ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## हिंदी भाषेच्या सक्तीचा अकारण वाद

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्रात हिंदी भाषेवरून राजकारण तापले असून हिंदी भाषेच्या सक्तीवरून व विरोधानंतर ऐच्छिक वरून सरकारी निर्णयामध्ये मध्ये गोंधळ बघायला मिळत आहे.महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा स्वीकार करत मराठी, इंग्रजीसोबत हिंदी भाषादेखील पहिलीपासून सक्तीची करण्यात येईल, असे सांगितले होते. यानंतर सरकारवर मोठ्या प्रमाणात टीका झाली. या टीकेनंतर सरकारने एक पाऊल मागे घेत हिंदी भाषा ही बंधनकारक नसेल, असे स्पष्ट केले होते. त्यानंतर राज्य सरकारने नवीन जीआर काढत केवळ 'अनिवार्य' शब्द वगळत असून, २० पटसंख्या असल्यास इतर भाषा शिकता येणार, असं नमूद केले आहे. मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ५ वीसाठी हिंदी तृतीय भाषा असल्याचा उल्लेख शासन निर्णयात केला गेला आहे. यावरुन सध्या राजकारण तापले आहे.

**शासनाचा नियम काय?**

दरम्यान राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार आता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल. हा नियम मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या दोन्ही शाळांना लागू होईल. मात्र, जर विद्यार्थ्यांना हिंदीऐवजी इतर कोणतीही भारतीय भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा असेल, तर त्यांना तशी परवानगी दिली जाईल. या बदलामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार आणि गरजेनुसार भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य मिळेल. जर हिंदीव्यतिरिक्त दुसरी कोणतीही भारतीय भाषा शिकण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांची एका वर्गात किमान २० संख्या असेल, तर त्या भाषेसाठी शाळेत शिक्षक उपलब्ध करून दिला जाईल. जर ही संख्या २० पेक्षा कमी असेल, तर त्या भाषेचे अध्यापन ऑनलाइन पद्धतीने केले जाईल. या आदेशात सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असेल, हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

मराठीच्या मुद्द्यांवरून आग्रही असलेल्या मनसेने आता शालेय शिक्षणातील हिंदी भाषेवरून राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत योग्य आहे?, खरंच शाळेतील अभ्यासक्रमात हिंदी भाषा असली, तर मराठीचा अपमान होणार आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, याचा समस्त मराठी जनांनी विचार करायला हवा.

तिसरी भाषा म्हणून हिंदीला मान्यता दिली म्हणजे मराठीचा अपमान होतो, असा प्रचार करणे चुकीचे आहे. त्रि भाषेचे सूत्र नवीन शैक्षणिक धोरणात आहे, त्यामध्ये मातृभाषा अनिवार्य असून त्या व्यतिरिक्त दोन भाषा असून त्यातील एक भारतीय भाषा असली पाहिजे, असे नमूद केले आहे. आधी महाराष्ट्र सरकारने हिंदी भाषा अनिवार्य केली होती. मात्र, जीआर काढून त्यातील अनिवार्यता हा शब्द काढून टाकलेला आहे. कुठलीही तिसरी भारतीय भाषा विद्यार्थ्यांना शिकता येईल. त्यात हिंदी भाषेचा समावेश आहे, स्वाभाविकपणे लोक आपल्याकडे इंग्रजी स्वीकारतात, त्यामुळे कुठलीही तिसरी भारतीय भाषा शिकणे गरजेचे आहे, असे स्पष्टीकरण देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आता एकच गोष्ट आपल्या सगळ्यांना माहीत आहे की, इंग्रजी ही जगाची भाषा मानून सर्वत्र तिचा आपण पुरस्कार केला आहे. इंग्रजी ही व्यवहारभाषा असल्यामुळे त्याचे कौतुक करायला हरकत नाही; परंतु भारतीय भाषांचा तिरस्कार करणे योग्य आहे का ? भावनिक साद घालणाऱ्या भारतीय भाषा या इंग्रजीपेक्षा चांगल्या आहेत, याचा विचार आपण करणार आहोत की नाही?. नवीन शैक्षणिक धोरणाने सर्वात महत्त्वाचे काम जे केले ते म्हणजे मराठीला ज्ञानाभाषा बनवण्याचा मार्ग खुला केला आहे. महाराष्ट्रात आपण इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी) हे मराठीत शिकवायला लागलो आहोत, जे यापूर्वी कधीच घडले नव्हते. नवीन शैक्षणिक धोरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात आपले डॉक्टर तयार होणार आहे, ते मराठीत शिक्षण घेऊ शकतात. एवढंच नव्हे तर एमबीएचे शिक्षणदेखील मराठीत शिकता येईल, असे दालन राज्य सरकारकडून उघडले असेल, तर मराठी भाषेबद्दल राज्य सरकारला आदर राहिलेला नाही, असा युक्तीवाद जर कोणी करत असेल, तर तो मुर्खपणा समजायला हवा.

मराठी भाषा, मराठी साहित्याबाबत नव्या पिढीला सजग करणे हे जितकी सरकारची जबाबदारी आहे त्यापेक्षा मराठी पालकांची आहे. घराच्या चार भिंतीत मराठी बोलून चालणार नाही, तर प्रत्येक मराठी माणसांने संवादासाठी जास्तीत जास्त मराठी भाषेचा वापर करायला हवा. चीन, जपान या देशात त्यांच्या स्थानिक भाषांना महत्त्व दिले जाते.शालेय शिक्षणातील हिंदीवरून वाद करण्यापेक्षा महाराष्ट्रात राहणाऱ्या अमराठी व्यक्तींना मराठी बोलण्यास जरी आपण भाग पाडले तरी, हिंदीचा अवमान होणार नाही. मराठीचा अभिमान असल्याचे दाखवण्याची संधी प्रत्येकाला मिळू शकते.हिंदीच्या सक्ती वर शरद पवार यांनी फार संतुलित उत्तर दिले. हिंदीची सक्ती असू नये. पण हिंदी भाषेची द्वेषा करणे हे विद्यार्थ्यांच्या हिताचे नाही. फक्त सक्ती असू नये. शेवटी त्या विद्यार्थ्याला जे हवंय ते त्याने करावं. त्याच्या पालकांनी त्याला जे मार्गदर्शन केले त्यानुसार निर्णय घ्यावा. हिंदीची सक्ती नको. एखाद्याला येत असेल किंवा तो शिकत असेल तर नाही बोलण्याचे कारण नाही, असे शरद पवार म्हणाले.

# रा. स्व. संघ ही सर्वसमावेशक संघटना-राज्यपाल

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – रा.स्व. संघ हे उच्चवर्णीयांची संघटना आहे हा हेतूपुरस्सर पसरवलेला गैरसमज आपल्या पुस्तकातून दूर करताना संघ ही सर्वसमावेशक संघटना असल्याची वस्तुस्थिती रमेश पतंगे यांनी आपल्या पुस्तकातून अधोरेखित केली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. लेखक व विचारवंत रमेश पतंगे लिखित 'व्हाय आर वी इन द आरएसएस?. ' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

पूर्वी संघासाठी कार्य करणाऱ्यांना शासनात पदे स्वीकारता येत नसत, असे सांगून आज देशाचे पंतप्रधान, अनेक राज्यांचे राज्यपाल व मुख्यमंत्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्याचे राज्यपालांनी सांगितले. देशात भूकंप, नैसर्गिक आपदा व रेल्वे अपघात होतात त्यावेळी संघाचे स्वयंसेवक नेहमीच सेवा कार्यात अग्रेसर असतात, असे राज्यपालांनी सांगितले.

उत्तर पूर्वेच्या राज्यातील लोकांना देशाच्या मुख्य प्रवाहाशी भावनेने जोडण्याचे काम रा.स्व. संघ करीत असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या स्थापनेचे शताब्दी वर्ष साजरे करीत असताना रमेश पतंगे यांचे संघावरील पुस्तक प्रकाशित होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना राज्यपालांनी लेखक पतंगे तसेच अनुवादक डॉ अश्विन रांजणीकर यांचे अभिनंदन केले.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी पुस्तकातील निवडक उतारे वाचून दाखवले तर 'आम्ही संघात का आहोत ' या श्री. पतंगे यांच्या मूळ मराठी पुस्तकाचे अनुवादक डॉ. अश्विन रांजणीकर यांनी




आपले विचार व्यक्त केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी तसेच उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी हे देखील पूर्वी संघ प्रचारक होते. रा. स्व. संघ आपल्या स्वयंसेवकांना भारत मातेच्या गौरवासाठी काम करण्यास सांगतो, या कारणास्तव आपण आयुष्यभर संघासाठी कार्य केले, असे रमेश पतंगे यांनी सांगितले. पुस्तकाचे भाषांतर सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये होणार असल्याची माहिती श्री. पतंगे यांनी यावेळी दिली.

रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'साप्ताहिक विवेक'तर्फे प्रकाशित या पुस्तकाला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रस्तावना आहे.

## एअर मार्शल प्रदीप बापट यांची माजी सैनिक महामंडळाच्या संचालकपदी नियुक्ती

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** एअर मार्शल प्रदीप बापट, PVSM VSM (निवृत्त) अध्यक्ष अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद, महाराष्ट्र आणि गोवा यांची महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को) च्या संचालकपदी १८ जून २०२५ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने नियुक्ती करण्यात आली आहे. मेस्को ही महाराष्ट्र शासनाची उपक्रम संस्था असून, १८ जानेवारी २००२ रोजी तिची स्थापना झालेली आहे.ह्या संस्थेचा मुख्य उद्देश माजी सैनिकांच्या पुनर्वसन व कल्याणासाठी तसेच विविध क्षेत्रांमध्ये त्यांना अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांच्या नियुक्तीमुळे मेस्को (MESCO) या संस्थेच्या दृष्टीकोनात नवचैतन्य निर्माण होईल,तसेच माजी सैनिकांचे सक्षमीकरण आणि मुख्य प्रवाहात त्यांचा समावेश करण्यावर अधिक भर दिला जाईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.ही संचालक पदाची प्रतिष्ठेची नियुक्ती राज्य शासनाच्या माजी सैनिकांप्रती असलेल्या कटिबद्धतेचे व त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षेतील आणि विकासातील योगदानाचे प्रतिक आहे.



एअर मार्शल बापट (निवृत्त), यांना यापूर्वी २६ जानेवारी २०२० रोजी परम विशिष्ट सेवा पदक व २६ जानेवारी २०१४ रोजी विशिष्ट सेवा पदक राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते.तसेच २६ एप्रिल २०२२ रोजी त्यांना मध्यप्रदेश रत्न अलंकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या नियुक्तीबद्दल अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे सर्व सदस्यांनी हार्दिक अभिनंदन व गौरवभावना व्यक्त केली आहे.

# राजभवन येथे पश्चिम बंगाल राज्य स्थापना दिवस साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – पश्चिम बंगालने देशाला अनेक क्षेत्रात थोर विचारवंत व क्रांतिकारक दिले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात लाल बाल पाल या त्रयींसह महाराष्ट्र, पंजाब व पश्चिम बंगालने देशाला नेतृत्व प्रदान केले, असे नमूद करून विकसित भारताचे लक्ष्य गाठताना देखील महाराष्ट्रासह पश्चिम बंगाल मोठे योगदान देईल, असा विश्वास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.




'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे पश्चिम बंगाल राज्य स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल राधाकृष्णन बोलत होते.

पश्चिम बंगाल देशातील महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र असून या राज्याने देशाला वैज्ञानिक, चित्रपट निर्माते, संगीतकार व कलाकार दिले आहेत. बंगालने देशाला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, डॉ. मेघनाद सहा, हिरेन मुखर्जी, प्रणब मुखर्जी, सोमनाथ चॅटर्जी यांसारखे संसदपटू दिले असे सांगून आपल्याला प्रणब मुखर्जी व सोमनाथ चॅटर्जी यांच्या कार्यकाळात काम करण्याची संधी मिळाली असल्याचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी नमूद केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पश्चिम बंगालच्या लोकसंस्कृतीचे लोकगीत व नृत्याच्या माध्यमातून उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी यावेळी स्वागतपर भाषण केले तर अवर सचिव करुणा वावडणकर यांनी आभार मानले. राज्यपालांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. केदारनाथ कळवणे, मुंबईतील बंगाली भाषिक निमंत्रित,

विद्यापीठाचे विद्यार्थी, कलाकार तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांनी यावेळी सजीव चित्रकला सादर करीत आपल्या कलाकृती राज्यपालांना भेट दिल्या.

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पश्चिम बंगालचे 'एलो दुर्गा माँ' लोकगीत, रवींद्रनाथ टागोर यांच्या दृष्टीतून पश्चिम बंगाल हे एकपात्री सादरीकरण, रैबेनशे लोकनृत्य व मुलींचे झुमर लोकनृत्य सादर केले.

## आज गुरू पाठीराखा दिंडी माहितीपटाचे प्रदर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**


**जालना** – आषाढी वारीनिमित्त जालना येथील दानकुंवर महिला महाविद्यालयात गुरू पाठीराखा या दिंडी माहितीपटाचे प्रदर्शन शनिवार, दि. २१ जून रोजी सायं. ५ वाजता होणार आहे. वारकरी धर्म संकीर्तन सेवा प्रतिष्ठान कुंभारझरी (ता. जाफराबाद) येथून पंढरपूरला जाणारी पायी दिंडी शनिवारी जालना मुक्कामी येत असून या दिंडीच्या स्वागतासाठी मराठी भाषा व वाङ्मय विभाग श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय आणि मराठी विभाग, जे.ई.एस. महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.




या समारंभाच्या अध्यक्षस्थानी दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता, प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक बसवराज कोरे यांच्यासह या माहितीपटाचे लेखक व दिग्दर्शक विनोद जैतमहाल, छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर प्रमुख मार्गदर्शक असणार आहेत. कुंभारझरी येथील दिंडी मार्गदर्शक ह.भ.प. सोनुने गुरुजी, जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, प्रसिद्ध फिल्म एडिटर अभिजित चव्हाण यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती असेल.

जालना शहर व परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी पालखी दर्शन व माहितीपट प्रदर्शन आणि कीर्तन, श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. तळेकर, जे.ई.एस. महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनुने, श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग प्रमुख डॉ. वासुदेव उगले यांनी केले आहे.




# जात्यावरच्या ओव्या......

बाळाला झाली दिठं
माझ्या जीवाला खातरी
कुंदाच्या कळीनं
लावे सुरमा नेतरी ||१३३||

दुःख या सुखाला
माय बहिण बोलवा
साखरच पाणी
देते तोंडाला ओलावा||१३४||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# (सहन) शीलं परमं भूषणम्
## सहनशीलतेतून तेज निर्माण करणारे जीवनमूल्य




ज्योतिर्मय साहित्य


आजच्या धावपळीच्या, प्रतिक्रिया-प्रधान काळात ''सहन करणं'' ही गोष्ट दुर्बळपणाचं लक्षण मानली जाते. पण सहन करणारा दुबळा नसतो, तो अधिक सशक्त असतो. कारण त्याच्या मनात आत्मविश्वास असतो, आणि आचरणात संयम. पण आजच्या काळात सहनशीलता नावाचं हे तेजस्वी शीलच लुप्त होत चाललं आहे. तरुण पिढीजवळ सहनशीलता तर नावालाही उरलेली नाही. जरा काही मनाविरुद्ध घडले की लागलीच संताप, राग, द्वेष, चिड किंवा आत्महत्या ठरलेली.

मग ज्यांनी आपल्या आयुष्यात सहनशीलतेचं परमोच्च दर्शन घडवलं अशी उदाहरणं मला आठवायला लागली. या सहनशीलतेच्या जोरावरच ते आपल्या आयुष्यात मोठी कामगिरी करून दाखवू शकले. सहनशीलता म्हणजे दुर्बलता नव्हे. आलेल्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याचं ते एक जीवनमूल्य आहे असं मला वाटत. मला संत ज्ञानेश्वरांचं उदाहरण आठवलं. ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताई या भावंडांचं संपूर्ण जीवन म्हणजे सहनशीलतेचा अखंड प्रवास ! ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी विठ्ठलपंतांनी संन्यास स्वीकारल्यानंतर गुरुआज्ञेवरून गृहस्थाश्रम स्वीकारला. पण समाजाने या निरागस, निष्पाप भावंडाना त्यांचा काही एक दोष नसताना वाळीत टाकलं. त्यांचा अपरिमित छळ केला. पण तरीही समाजाप्रती त्यांच्या मनात प्रेम आणि करुणाच होती. ज्ञानेश्वरांनी तर अखिल विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचं हे सहनशील असणं हे त्यांच्या ज्ञानाइतकंच तेजस्वी होतं.



मर्यादा पुरषोत्तम श्रीराम तर सहनशीलतेचा आदर्श ! ते केवळ वीरपुरुष नव्हते तर शीलाचं साक्षात मूर्तिमंत रूप होते. कैकेयीच्या वचनामुळे १४ वर्षांचा वनवास पत्करताना त्यांनी कोणताही रोष व्यक्त केला नाही. पित्याच्या वचनाचा सन्मान करत ते हसतमुखाने अरण्यात गेले. सीतेवर समाजाने शंका घेतल्यावर, राजधर्म जपण्यासाठी त्यांनी वैयक्तिक दुःख गिळून सीतेला वनवासात पाठवलं. हा त्याग त्यांच्या शीलतेचा परमोच्च बिंदू ठरतो.

विभीषण रावणाचा भाऊ असूनही जेव्हा शरण येतो, तेव्हा राम म्हणतात ''शरणागताचा मी त्याग करणार नाही.'' ही त्यांच्या सहनशीलतेतील करुणा आणि नीतिनिष्ठा दर्शवणारी गोष्ट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं जीवन हे तर शीलाचं आदर्श उदाहरण. त्याग, संयम आणि सहनशीलता यांचं दर्शन त्यांनी आपल्या जीवनात घडवलं. अहिल्याबाई होळकर यांचं जीवनही यापेक्षा वेगळं नाही. **(क्रमशः)**






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# पादसेवन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

वाईट विचार मनाला शिवत पण नाहीत सात्विकतेचं तेज मिळते. समाज सात्विक होण्यासाठी मदत होते.

देव,सात्विक माणसे ,अग्नि,साधूसंत, अतिथी, यती,आत्मज्ञानी महात्मा, गाय व वासरू यांची पूजा करावी.

समर्थ आपल्याला कुणाकुणाची पूजा करायला सांगतात तर शंकराच्या पिंडी, भैरव, देवी भगवती, बनशंकरी, नाग, गणेश, शारदा, विठ्ठल रखुमाई, रंगनाथ, जगंनाथ, श्रीकृष्ण, पंचायतने, हनुमंत, गरूड, तिन्ही देवी, नरसिंह, लक्ष्मी माता, अन्नपूर्णा माता शारदामाता, मत्स्य, कुर्म, वराह, नरसिंह, वामन परशुराम, राम, गोविंद. संधेतील चोवीस नावे घेऊन पूजा करावी. ऊदा, केशव, नारायण, वासुदेव, अनिरुद्ध, पुरूषोत्तम, वामन, श्रीधर, पद्मनाभ, अधोक्षज, नरसिंह, संकर्षण अशा प्रकारच्या चोवीस नावांचा ऊल्लेख करावा.


आपल्या घराण्यातील वंशपरंपरागत चालू असलेले कुलधर्म, कुलाचार चालू ठेवावेत. नाना प्रकारची फळेफुले सुगंधी वनस्पतीची, द्रव्ये, तांबूल,भारी अलंकार वस्त्रे, अर्पण करून आरती करावी.

परंतु हे सर्व मनापासून करावे कुठेही डामडौल,असु नये किंवा अहंभावाने करू नये तर समर्पित भावनेने करावे.

हे करत असताना मनाची शरिराची सुर्चिभुतता असणे आवश्यक आहे. हे परमेश्वरा मी तुझाच आहे काही चुकलं तर सांभाळून घे.काया वाचा, मन,वित्तानेपूजन करावे. मनापासून केलेली भक्ति भगवंताला प्रियचं असणार यात संदेह नाही.

समास पाचवा समाप्त
श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ

# संत हे चालते-बोलते देवच आहेत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

व्यवहारात ज्याला चांगले वागता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. व्यवहारात झालेल्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देणार नाही असा निश्चय करावा, आणि सद्गुरूआज्ञा प्रमाण मानून तो तडीस न्यावा. साधनावर जोर द्यावा. स्वत: कोण याची ओळख करून घ्यावी. भगवंतापरते कोणी नाही हे कळले म्हणजे मी कोण हे कळते. निर्गुण जरी समजले तरी सगुण नाही सोडू. माझ्या मुखी राम आला यापरते दुसरे भाग्य ते कोणते ? हृदयात स्फूर्ती येऊनच आपण बोलतो; मग आमच्या मुखात राम आला तर तो हृदयात नाही असे कसे म्हणावे ?

तुम्ही मला उपनिषदांतले सांगा म्हटले तर कसे सांगू ? ज्याने जे केले तेच तो सांगणार. एक - गुरुआज्ञापालन याशिवाय दुसरे काहीच मी केले नाही, तर मी दुसरे काय सांगणार ? संताचा समागम केला म्हणजे आपण मार्गाला लागतो. आपण साधूला व्यवहारात आणतो, आणि नंतर तो आपल्याशी व्यवहाराने वागला म्हणजे त्याच्याजवळ समता नाही म्हणून उलट ओरड करतो! संत हे देहाचे रोग बरे करीत नसून, त्या रोगांची भीती नाहीशी करतात. संत हे चालते-बोलते देवच आहेत. संतांच्या देहाच्या हालचालींना महत्त्व नाही. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे कार्य होय. संतांचा कोणताही मार्ग हा वेदांच्या आणि शास्त्राच्या उलट असणे शक्यच नाही. संत सूर्यासारखे जगावर स्वाभाविक उपकार करतात. सूर्याचे तेज कमी होते आहे असे शास्त्रज्ञ म्हणतात, पण संतांचे तेज मात्र वाढतेच आहे.

श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेला मुलगा भीक मागताना पाहून आपल्याला त्याची कीव येते, त्याप्रमाणे मनुष्यजन्माला येऊन आपण दु:ख करतो हे पाहून संतांना वाईट वाटते. एकूण योनी इतक्या आहेत की, त्यांमध्ये मनुष्यजन्म येणे कठीण आहे. मनुष्यजन्म येऊन भगवंताची प्राप्ती झाली नाही तर जीवाचे फार नुकसान आहे. म्हणून अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, त्यांची कृपा प्राप्त करून घ्यावी. संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भीतीच नाही. आपण प्रपंचात इतके खोल जातो, की संतांची हाक ऐकूच येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे. संतवचनावर विश्वास ठेवूया, म्हणजे भगवत्प्रेम लागेलच. ते लागल्यावर विषयप्रेम कमी होईल. म्हणून संतांची संगत करणे एवढे जरी केले तरी कल्याणच होईल.

संत-संगती आणि नामस्मरण यानेच भगवत्प्रेम येईल.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

विशाखा :

विशाखा ही श्री राधा व कृष्ण या युगला सेवेत सदैव तत्पर असणारी सखी होती. राधा राणीला वस्त्र आणि अलंकार देणे, त्याची निवड करणे, आणि उतरलेली वस्त्रे व्यवस्थित ठेवणे, ही कामे विशाखा करीत असे. विशाखाच्या वडिलांचे नाव पवन आणि आईचे नाव वहीका होते. सुगंधी द्रव्याचे युगल जोडीस उत्तम उत्तम चंदन लेप लावणे,त्यांचे सन्निध धूप लावणे, सुगंधी द्रव्य यांचे लेप लावणे ही कामे ती करी. राधा राणी साठी सुंदर मेहंदी चे नक्षीकाम काढणे हे तिचे काम होते. ही राधा राणीस हिताच्या गोष्टी सांगे, ही अत्यंत बुद्धिमान अशी विशाखा होती. विजे सारखी चमकणारी लख लखित अशी तिची अंग कांती होती. एकदा श्रीकृष्णाची मुरली धून वाजत असताना राधा काजळ घालत होती. एकाच डोळ्यात काजळ रेखल्यावर तिला रहावले नाही आणि ती कृष्णाकडे धावत गेली. भगवान श्रीकृष्णाने पाहिले की राधा फक्त एकाच डोळ्यात काजळ रेखून आली आहे. त्यांनी आपली अंगठी एका दगडावर घासली आणि ते काजळ राधेच्या दुसऱ्या डोळ्यात घातले. डोळ्यात अंजन घातले म्हणून या गावाचे नाव अंजनौक असे पडले. हेच विशाखाचे गाव आहे. विशाखाचे वय हे राधे एवढेच होते. आजही तिच्या गावी विशाखा या सखीचे मंदिर बांधले आहे. विशाखा हीच कलियुगात स्वामी हरिराम व्यास या नावाने अवतरीत झाली.

विनम्र भाव, प्रभूचे अक्षुन्न स्मरण, निर्याचक भक्ती आणि समर्पण या भावांनी या सख्या सर्वोच्च स्थान प्राप्त करू शकल्या.

आपल्या सारख्या लोकांना त्यांच्या चरित्रातून योग्य ते मार्गदर्शन मिळो ही युगल चरणी विनम्र प्रार्थना!

राधे राधे!

परममंगल महालक्ष्मी श्री राधेची तिसऱ्या क्रमांकाची सखी चित्रा राणी हिच्या विषयी आज आपण अधिक माहिती घेऊ.

३) चित्रा

चित्राही युगल जोडीच्या भक्तीत आकंठ बुडलेली अशी सखी होती.

हिला पिवळे वस्त्र नेसायला खूप आवडायचे. राधा रानी आणि भगवान श्रीकृष्ण यांना फळे, शरबत देणे, त्यांची सेवा करणे. युगल जोडीचा शृंगार करणे, ही कामे ती करायची. भगवती स्वरूपा चित्रा या सखीचा रंग केशरा सारखा होता. ही ब्रह्मांचल पर्वतावर चीतोली या गावी राहायची. तिच्यात करुणा भाव हा अत्यंत ओतप्रोत पणे भरलेला होता.ती अतिशय बुद्धिमान होती आणि ती सांकेतिक भाषा तज्ञ होती. तिला विविध भाषेचे ज्ञान होते. चित्राच्या आईचे नाव कारसिका आणि वडील कटुरा होते. चित्रा ही राधे पेक्षा २६ दिवसाने मोठी होती. संगीताची कुशल जाणकार, तज्ञ, साहित्य, शास्त्र याची पंडित, पशुपालन, पशुची रोग चिकित्सा यांची विशेषज्ञ होती. ती शेती तज्ञ होती बागकाम, फुलांची सजावट हे तिच्या आवडीचे विषय होते. हिचे गाव चिकासौली आहे. भगवती स्वरूपा चित्रा देवीचे मंदिर याच गावी आहे. प्रत्यक्ष परमात्म्याची सेवा तर करण्याचे न आपणास भाग्य आहे ना आपली तेवढी पात्रता.जगतगुरु तुकाराम महाराज म्हणतात तुमच्या दासाचाही दास मज करोनी ठेवा.

जेंव्हा तुकाराम महाराज असे म्हणत असतील तेंव्हा तर आपली दासाचे दास होण्याचीही लायकी नक्कीच नाही.म्हणून निदान अनन्य भावाने आपण या महात्म्यांची क्षमा याचना करून त्यांचे चरणी विनम्र तरी होउयात.

जय जय श्री राधे, जय कुंज विहारी !

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं यशो देहि रिपुंजहि।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं भवेत् सर्वं शुभं शुभम्।। ४५ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. यश दे. शत्रूचाविनाश कर. जगदंबिके, तुला नमस्कार असो. सर्व काही शुभ शुभ व्हावे.

**जगदम्ब नमस्तुभ्यं नित्यं मे कुरु रक्षणम्।**
**अशुभात् रक्ष मे देवि मातृके रेणुके सदा।। ४६ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझे नित्य रक्षण कर. हे देवी, रेणुका माते, अशुभापासून माझे सदैव रक्षण कर.

**जगदम्ब नमस्तुभ्यं करणीया कृपा त्वया।**
**नित्यं तिष्ठतु ते नाम वाचि स्मृत्यां च मे शुभे।।४७ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू कृपा करावीस. हे शुभे, तुझे नाम नित्य माझ्या वाणी आणि स्मरणात राहो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

# आरोग्य संजीवनी




## ज्वारी, बाजरी, नाचणीची भाकरी

ज्योतिर्मय साहित्य

तांदळाची भाकरी सॉफ्ट असते तर नाचणी, ज्वारीची भाकरी कडक होते. बनवण्याच्या पध्दतीपद्धती नुसार भाकरी मऊ होणारी कडक ते ठरतं. चपाती पेक्षा भाकरी तब्येतीसाठी उत्तम. कोणती भाकरी कधी खायची. नाचणी, बाजरीची भाकरी खाल्ल्यानं काय फायदे होतात, ज्वारीची भाकरी ही थंड असते. बाजरी उष्ण असते. नाचणी सुध्दा शीत असते पण अतिप्रमाणात नाही. चांगल्या ताकदीसाठी नाचणी उत्तम असते. ज्वारी रुक्षता देणारी आहे, बाजरी सुध्दा रुक्ष असते. ज्वारी आणि नाचणी पचायला हलकी असते. बाजरी पचायला थोडी जड असते.

बाजरीच्या भाकरी मध्ये भरपूर पोषक असतात. याच्या सेवनाने अनेक आजारांचा धोका कमी होतो. आजकाल ते खूप लोकप्रिय आहे कारण ती ग्लूटेन फ्री आहे आणि वजन कमी करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. बाजरी जटिल कर्बोदका मध्ये बनलेली असते, जी शरीराद्वारे हळूहळू शोषली जाते. ही भाकरी खाऊन तृप्त वाटते आणि जास्त खाणं टाळता येतं. बाजरी मॅग्नेशियमचा एक चांगला स्रोत असल्याने, हृदयाच्या रुग्णांनी त्यांच्या आहारात बाजरीच्या भाकरीचा समावेश करणे चांगले आहे. मॅग्नेशियम बीपी आणि मधुमेह यांसारख्या हृदयरोगाच्या जोखीम घटकांना प्रतिबंधित करण्यास सक्षम आहे. एलडीएल (खराब) कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी आणि स्ट्रोक पासून संरक्षण करण्यासाठी मॅग्नेशियम फायदेशीर आहे. हिवाळ्यात बाजरीच्या भाकरीचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते.


ज्वारी खाल्ल्याने ऊर्जा मिळते. ही ऊर्जेचा चांगला स्त्रोत आहे. शिवाय वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. वास्तविक ज्वारी खाल्ल्यानंतर फार वेळ भूक लागत नाही, जे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करते. ज्वारीमुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. त्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. याशिवाय, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमचा चांगला स्रोत आहे, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. ज्वारी हे वजन कमी करण्यास मदत करणारे धान्य आहे. हिवाळ्यात ज्वारीचे सेवन करणे फायदेशीर असते. ज्वारीत अनेक पौष्टिक घटक असतात जे आरोग्य निरोगी ठेवू शकतात. जर गहू खाण्याची एलर्जी असेल तर ज्वारीचे सेवन करणे उत्तम. ज्वारीत भरपूर फायबर असते, त्यामुळे ते सहज पचते. ज्वारी कोलेस्ट्रॉल नियंत्रित करते.

नाचणीच्या भाकरीत अनेक पोषक तत्व असतात. ही भाकरी पचायला हलकी असते. एनिमियाचा त्रास असल्यास अंगातलं रक्त वाढवण्यासाठी नाचणीच्या भाकरीचा आहारात समावेश करावा. ज्यांना डायबिटीस आहे त्यांनी चपाती खाण्या ऐवजी नाचणीची भाकरी खावी. तिन्ही प्रकारच्या भाकऱ्या तब्येतीसाठी चांगल्या असतात. आपल्या आवडीनुसार, गरजेनुसार आणि वातावरणातील बदल लक्षात घेऊन कोणत्या ऋतूत कोणती भाकरी खायची हे ठरवू शकता. उन्हाळ्यात ज्वारी, नाचणीची भाकरी खावी. हिवाळ्याच्या दिवसात या दोन प्रकारच्या भाकऱ्या बरोबर बाजरीच्या भाकरीचा आहारात समावेश करावा.

**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

लग्न झाले की प्रत्येक सून सुरुवातीस नम्रच असते हळू हळू ती नम्री होते. सीतेला हे सांगण्याची गरजच नव्हती त्या आधीच प्रगल्भ होत्या. पण त्या निमित्ताने हा उपदेश आपणास केला आहे. विचारी माणसाला दुःख होतच नाही ,असे नाही पण आपणास दुःखाचा कालावधी कमी करता आला पाहिजे. या चार सुनांना घेऊन ते सर्व अयोध्ये कडे जाताना कांहीं शुभ शकुन आणि कांहीं अशुभ शकुन झाले. कावळा घरावर बसला की पाहुणे येतात.म्हणून बायका कावळ्या उडवतात.काळया दाताचा पुरुष स्वप्नात आला तर मृत्यू जवळ आला आहे हा संकेत आहे. अचानक

भगवान परशुराम समोर आले. या रामाने आपल्या आराध्याचे धनुष्य तोडले म्हणून त्यांना राग आला होता. त्यांच्यात व रामात युद्ध झाले. रामांनी परशुरामास पराजित केले. त्यानंतर सर्व पुढे निघाले. त्यांचे भव्य स्वागत अयोध्यावासी यांनी केले. असे म्हणतात अयोध्या वासी कायम नटून थटून दिवसभर रहात असत. उत्सवाची भूमी म्हणजे अयोध्या. त्यांना असे वाटले की आता आपल्या आयुष्यात अखंड आनंदच राहणार आहे. दशरथ व राण्या यांना मुले सुना पाहून धन्यता वाटली. आता दशरथाच्या मनात निवृत्तीचे वेध लागले.आपण प्रपंचात विषयी किती वेळ ममत्व ठेवणार हे आपल्याला कधीतरी समजले पाहिजे. मनाची तयारी आधी हवी की कोणत्याही क्षणी आपण हे जग,प्रपंच सोडण्यास आपण लगेच तयार असू आपल्याला हा प्रपंच, व्यक्ती,जग सोडून जायचे ना मग यांचे बद्दल ममत्व सोडले पाहिजे. **(क्रमशः)**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

## फुलमाला....





निशिगंध...

शुभ्र देखण्या तुऱ्यात,
फुलतो हा निशिगंध.
दरवळतो चोहीकडे,
मनभावन याचा सुगंध.

रुप या फुलाचे नेहमी,
खुलते अन् टवटवीत.
म्हणूनच शुभकार्यात,
याला मान मिळे नित्य.

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### चित्रकार रवींद्रनाथ – भाग एक

रवींद्रनाथ चित्रकलेकडे कसे वळले त्याची कथाही मजेशीर आहे. १९२४ मध्ये ते दक्षिण अमेरिकेत गेले होते. तेथील ब्यूनॉस आयर्स या शहरातील वास्तव्यात ते आजारी पडले. तिथे असणारी स्पॅनिश कवयित्री आणि लेखिका व्हिक्टोरिया उकाम्पू ही रवींद्रनाथांच्या साहित्यावर अपार प्रेम करणारी थोर विदुषी होती. त्यांना बरं वाटावे म्हणून ती त्यांना एका मोठ्या सुंदर उद्यानगृहात घेऊन गेली. तेथील सुंदर वातावरणात रवींद्रनाथ रमले आणि त्यांना बरे वाटले. तेथे त्यांच्या काही कविता जन्माला आल्या. त्या पूरबी कविता संग्रहात प्रकाशित झाल्या आहेत. या कविता लिहीत असताना रवींद्रनाथ सहज म्हणून काही चित्रे काढत. ते अशा रेषांची निर्मिती करीत की ज्या रेषा जिवंत होऊन प्राणी, पक्षी आदींचा आकार घेत. रवींद्रनाथांमध्ये लपलेला चित्रकार या व्हिक्टोरिया नावाच्या या विदुषीने ओळखला आणि त्यांना चित्रे काढण्यासाठी प्रोत्साहन दिले. एका दृष्टीने हे तिचे रवींद्रनाथांवर आणि पर्यायाने भारतावर देखील मोठे उपकार आहेत.

पुरबी च्या हस्तलिखितात या कविता आणि चित्रे आहेत. यातील चित्रे म्हणजे केवळ आकृत्या नसून ताल आणि लयीचे नियम सांभाळून निर्माण झालेल्या रचना आहेत. जिवंत भासणारे डोळे, तीक्ष्ण दात, विविध भाव व्यक्त करणारे मानवी चेहरे, नागमोडी वळवळणारे साप, पक्षी अशा विविध प्रकारच्या कलाकृती या हस्तलिखितात आहेत. हे हस्तलिखित म्हणजे रवींद्रनाथांच्या कल्पना आणि प्रतिभाशक्तीचे द्योतक आहे. या चित्रांमधील प्राणी आणि पक्षी सर्वस्वी वेगळे आणि रवींद्रनाथांच्या कल्पनेतून निर्माण झालेले आहेत. ते वास्तविक जगातील नाहीत. स्वतः रवींद्रनाथ त्यांच्याबद्दल बोलताना म्हणतात,‘‘ हे प्राणी म्हणजे ज्यांना या जगातील अस्तित्वच नाकारले आहे, त्यांचे नेमस्त अतिशयोक्तीपूर्ण चित्रण असून या रचनांमधील पक्षी म्हणजे केवळ तुमच्या आमच्या स्वप्नात येऊन आपली झोप उडवणारे भयंकर असे जीव आहेत, ज्यांना त्यांचे घरटे आपण अगत्याने बहाल केलेल्या रेषांद्वारे केवळ कॅनव्हासवर आपल्याला प्राप्त होईल. ‘‘ या चित्रांचा संबंध रवींद्रनाथांच्या बालपणीच्या आठवणींशी, अनुभवांशी, स्वप्नांशी आणि अबोध मनाशी निगडित असावा. त्यांना त्यावेळी जाणवलेल्या अतिमानवी ( ) गोष्टी या रेषांच्याद्वारे जिवंत झाल्या असाव्यात.

चित्रकलेत अनेक पद्धती असतात, शैली असतात. त्या प्रत्येकातून काहीतरी शिकण्यासारखे असते. अमुक एक पद्धती चांगली आणि दुसरी वाईट अशा प्रकारचे वर्गीकरण यात करणे योग्य नाही. याबाबत रवींद्रनाथांची भूमिका अशी होती की आपल्या परंपरेतील शाश्वत मूल्यांचा वारसा सांभाळावा आणि जीवनाला सन्मुख राहून तो समृद्ध करावा. त्यातूनच त्यांनी चित्रकलेच्या विविध नव्या–जुन्या शैली पाहिल्या, विविध प्रकारांचे निरीक्षण केले आणि त्या समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच त्यांची चित्रकला विषयक जाणीव अधिकाधिक समृद्ध होत गेली.

शब्दांचा चित्रकार असलेल्या रवींद्रनाथांना आपण खरेखुरे रेषांचा चित्रकार व्हावे असे प्रकर्षाने वाटू लागले. कारण त्यांच्यातील कलावंत एवढा मोठा होता की केवळ शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होणे त्याला कुठेतरी अपूर्ण वाटत होते आणि त्यातूनच चित्रकार रवींद्रनाथांचा जन्म झाला असे म्हणावे लागेल. वयाच्या ६५ व्या वर्षी त्यांनी चित्रकलेच्या आराधनेला सुरुवात केली आणि नंतर त्यात कोणालाही तोंडात बोट घालायला लावेल एवढे प्राविण्य प्राप्त केले. यावरून आपल्या हे लक्षात येते की चित्रकलेचे औपचारिक शिक्षण घेण्याचे त्यांचे वय निघून गेले होते. आपल्याला कोणतीही नवीन गोष्ट शिकायची असेल तर वयाचे बंधन कधीही आडवे येत नाही. कोणत्याही वयात एखादी नवीन गोष्ट शिकण्याची सुरुवात आपण करू शकतो हेच रवींद्रनाथांच्या या उदाहरणावरून दिसते.

चित्रकलेसाठी लागणारे वातावरण खरंतर त्यांच्या घरात पूर्वीपासूनच होते. त्यांचे मोठे बंधू ज्योतीरिंद्रनाथ हे उत्तम चित्रकार होते. तसेच त्यांच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असलेले अवनींद्रनाथ यांनी बेंगॉल स्कूल ऑफ आर्ट ची स्थापना केली होती. त्यांची ही शाळा रवींद्रनाथांच्या निवासस्थानाच्या परिसरातच होती.

(क्रमशः)

# आंतरराष्ट्रीय योग दिन



ज्योतिर्मय साहित्य

आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस , चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे. आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# पिठले (झुणका)



ज्योतिर्मय साहित्य

यावर्षीचा उन्हाळा खूप कडक होता.. आणि मग अचानकच आलेला मुसळधार पाऊस.. त्याच्या धुवांधार बरसण्याने त्याचेही असेच रौद्र रूप राहील काय? कदाचित या काळजीने भराभर सगळ्यांच्या कार्यक्रमाची आमंत्रणे येऊ लागली.. डोहाळ जेवण, बारसे, साखरपुडा भिशी, एक ना दोन सलग बाहेरचे जेवण त्यात अलीकडे पूर्वीच्या काळचा टिपिकल मेन्यू जाऊन परप्रांतीय पदार्थांचेही आक्रमण वाढलेले आहे.. एक तरी पंजाबी भाजी, गुजराती उंदियो, कटलेट असतेच. बंगाली मिठाया आणि इतर पक्वानांची पण तितकीच रेलचेल असते.

भिशी मध्ये पाणीपुरी, पाव भाजी, डोसा इडली इत्यादी दक्षिणात्य पदार्थांवर भर. पण हे सगळे आवडत जरी असले तरी त्यातील सलगतेने कंटाळा येतो. निदान मला तरी. आपले घरगुती जेवणाचे भरलेले ताट आणि भरपूर दुभते यांने आपले मन आणि रसना दोन्हीं तृप्त होते... हो ना?

त्यातही आम्हां कुलकर्णी मंडळींचा पिठले हा पटकन करता येणारा आणि चव वाढविणारा खूप आवडता पदार्थ. म्हणून कार्यक्रम थोडे कमी झाल्यावर भरपूर सायीचे दही दूध घालून कालवलेला मऊ भात आणि घट्ट पिठले, अलीकडेच घातलेल्या कैरीच्या लोणच्याची लाल चुटूक फोड, कडलिंब शेंगदाण्याची चटणी, तूप आणि भरपूर ताक (ही पण कुलकर्णी सवय... शेवटी ताक पिल्याशीवाय आमचे जेवण पूर्ण होत नाही..) असे साधेच जेवण केले.. पण चवीचे चार घास पोटात गेले ...कारण पिठले..

डाळ तांदळाची हिंग, जिरे, खोबरे घातलेल्या साध्या मऊ खिचडी बरोबर आमच्याकडे दूध आणि मिरची, कोथिंबीर घातलेले पातळ पिठले करतात.. गरम भाकरीबरोबर भरपूर कांदा घातलेले घट्ट पिठले... माझी आजी मंद चुलीवर कांदा खमंग परतून घ्यायची त्यामुळे तिचे पिठले खूपच चविष्ट होई. पिठले करणे पण एक कला आहे खाली पाण्यात बेसन कालवून बीन गाठीचे केलेले पातळ पिठले मला जराही आवडत नाही. त्याला योग्य प्रमाण वापरून नीट शिजवले तरच ती चव उतरते. नाहीतर खरा स्वाद सगळाच हरवतो..

दुधातले पिठले, ताकातले पिठले, मोकळे पिठले, शेवग्याच्या शेंगांचे पिठले, वांग्याचे पिठले, लसूण आणि तिखट घातलेले घट्ट पिठले पान वाढू मध्यम घट्ट तूप घातलेले पिठले..हिरवीगार,भरपूर कोथिंबीर घातलेले पिठले, तव्यातले खरपूस पिठले,... असे कितीतरी पिठल्याचे प्रकार सहज तोंडाला चव आणतात. कुठले पिठले कधी करायचे आणि कशाबरोबर खायचे त्याचा एक खास मूड असतो.. आपल्याबरोबरचे कोणी तसेच रसिकतेने त्याचा आस्वाद घेणारे असेल तर जेवणाची रंगत वाढते..

कोकणात कुळथ्याचे पिठले करतात.. कॅनडा मध्ये लेकी कडे मूग डाळीचे तयार पीठ पण मिळते. त्याचेही कधीतरी मी पिठले करत असे.. जावई, लेक खात असत पण माझ्याबरोबर रसिकतेने मात्र नात खाई..




तिच्यात माझी ही उतरलेली आवड बघून भारी वाटे.. इकडे बाकी कोण माझ्या इतक्या आवडीने पिठले खात नव्हते पण लवकरच सासूबाई त्यात सामील झाल्या... त्यामुळे मी खास आम्हां दोघींसाठी इतर पदार्थ भरपूर असले तरी अधून मधून पिठले करत असे..

त्या गेल्यानंतर मधली दोन तीन वर्षे मी एकटीच माझ्यासाठी पिठले करत असे. आता सून आली.. तीच्याघरी दत्ताचे देऊळ असल्याने तिला कांदा खायची सवय नाही. पण ती संध्याकाळी कधीतरी आई मी जेवणार नाही भूक नाही म्हणाली तर तिला मी म्हणते हिंग, जिऱ्याचे पातळ पिठले करणार आहे भात खाशील ?... तर ती लगेच खुश होते गरम भात, तूप आणि पिठले इतके कौतुक करून खाते की तिचे वर्णन ऐकून इतकी वर्षे पिठले न खाल्लेला मुलगा ही तिच्या बरोबरीने आवडीने खातो... आणि माझ्या पिठल्या प्रेमाची सार्थकता झाली या तृप्तीने मी त्या दोघांकडे बघत राहते... (मी इथे थोडीशी गंमत म्हणून कुलकर्णी आणि इनामदार या आडनावर लिहिले आहे... पण त्याचा कुठल्याही ठराविक व्यक्तींशी संबंध नाही कृपया गैरसमज नसावा.. पिठले हा पदार्थ प्रत्येक मराठी माणसाला खूप प्रिय असतो याची मला जाणीव आहे आणि आनंद ही)






## इंदापूरी निखारे

### शाळेची ट्रिप....



ज्योतिर्मय साहित्य

नातू ६/७ वर्षाचा असेल... माझा मुलगा आणि सून त्याला शाळेत जाण्यासाठी तयारी करत होते... त्याला शाळेत जायचे नव्हते, तसे दोघांना सांगत होता. पण तो अडूनच बसला. मी नाहीच जाणार. सून त्याला रागवायला लागली, कसा जात नाही तेच पाहते?नातू त्यांच्या रूम मधून माझ्याकडे आला आणि म्हणाला, आबा मला आज शाळेत नाही जायचे. मी म्हणालो ठीक आहे जाऊ नको. मुलगा आणि सून शाळेचे नियम वगैरे सांगत असतांना नातू म्हणाला आबा रोज तेच तेच शिकवतात. ते सगळे मला येते. बोअर होते आबा...

ठीक आहे पण घरी तुला आवडेल तो अभ्यास करत बस...

मला म्हणाला मग गोष्ट सांगा मला नवीन...

हे सहजच आठवले ते आमचे गुरुजी आदरणीय राजन खान यांच्यामुळे... कथे मागची कथा हे अतिशय महत्वाचे पुस्तक सरांनी लिहिले आहे कित्येकजणांना ते पुस्तक कथा लिहिण्यासाठी मार्गदर्शन करणारे आहे...

आजोबा आणि नात, नाती यांचे किती मस्त नाते असते याचे वर्णन करण्यासाठी शब्द नसतातच. तो अतिशय उत्कट भावनांचा अविष्कार म्हणजे स्वर्गीय आनंद!आयुष्यात कोणत्याही गोष्टींचा आनंद घेऊ शकला नसाल किंवा सगळ्या गोष्टींचा आनंद उपभोगत असाल तरी नातवंडाच्या बरोबर मिळणाऱ्या आनंदाची बरोबरी जगात तुलना होऊच शकत नाही...

एक खंत वाटते...

हा आनंद मिळू नये याचा प्रयत्न वेगवेगळ्या माध्यमातून होत आहे... हे कथा किंवा कविते मागची कथा...

तर साल १९६०, वय वर्ष ८, इयत्ता – दुसरी तुकडी –अ

शाळा सुटल्याची घंटा वाजली...

गोंगाट सुरु करायच्या आधीच... गुरुजींनी हातातील छडी

टेबलावर जोरात आपटली... १९६० सालातील विद्यार्थी

गुरुजींचा प्रचंड धाक... सगळे चिडिचुप

एक नोटीस... उद्या सुट्टी असली तरी... आपण सर्व

सहलीला जाणार आहोत...

सकाळी ९ वाजता शाळेत यायचे... जेवणाचा डबा घेऊन यायचे... बिस्कीटचा कारखाना पहायला जायचे...

शाळेचा गणवेशच घालून यायचे...

तर तो घरी आला... त्याने आईबाबांना सांगितले... बाबांनी त्यांच्या आईबाबांना सांगितले... बाबांनी त्यांच्या भावाबहिणींना सांगितले... घरात एकच तयारी सुरु झाली...

जसा काही तो फार मोठा पराक्रम करायला जाणार आहे... डब्ब्यात पोळी द्यायची का पुरी

पुरी साधी का ? तिखटमिठाचि का गोड ?

भाजी कोणती ?

तो खेळायला गेला, तो खेळून घरी आला... सहल असल्यामुळे होमवर्क नव्हता... सकाळी आईबाबा शाळेत सोडायला... फार मजा वाटली... शाळा फारच लांब होती

रस्ता ओलांडला की शाळा... आईबाबा कधीच सोडायला आले नव्हते... ट्रिप म्हणजे खूप भारी... आईबाबा आले म्हणूनही खुश... बसमधे सगळे बसले... आईबाबांनी टाटा केले... कारखाना पाहून घरी... सर्वजण वाट पहातच होते... आज्जीआजोबा , आईबाबा , काका काकू ... कशी झाली सहल ? कसा होता कारखाना ? अनेक प्रश्न एकमेकात तंगड्यात अडकून आदळत होते... बस मधे बसलो, मग नावाच्या भेंड्या... गावाच्या भेंड्या...

खेळत खेळत कारखाना... खूप खूप मोठा खूप खूप पीठ

असं मोठ्ठ यंत्रात... मग त्याची बिस्किटे त्या यंत्रातच तयार... मग मोठमोठ्या डब्ब्यात

मग त्याचे पुडे... असं असतं हां मग सगळ्यांनी डब्बा खाल्ला... खूपच मोठ्ठा हॉल... सगळेजण एकाच वेळी...

आणि टेबल खुर्चीवर... मला डब्बा फार आवडला...

साबुदाणा वडा चटणी... मग कोणीतरी खूप मोठे सर आले... आमचे गुरुजी पण त्यांना सर म्हणत होते... त्यांनी विचारले आवडला का कारखाना ? आम्ही सगळे हो म्हणालो मग त्यांनी खूप काय काय सांगितले... म्हणाले यावर निबंध लिहा बक्षिस देणार आहे ते... सगळ्यांनी टाळ्या...

परत येतांना अगदी सगळ्यांना चारचार बिस्किटे दिली...

आज्जी , आजोबा , काका , काकू , आईबाबा

एका सुरात... कोठे आहेत बिस्किटं ?

रंगात आलेला तो म्हणाला... येता येता खाऊन टाकली...

अरे येड्या आज महाशिवरात्र ना !

म्हणजे तुझा उपवास मोडला ! सगळा आनंद क्षणात मावळला... खूप मोठी चूक झाली...

असे सगळ्यांकडे पहाताना जाणवले... अनं मोठ्याने रडायला... आज्जीनी त्याला जवळ घेतले...

काही नाही , चल, जा देव घरात... आणि देवाला नमस्कार कर... सांग , मी चुकलो क्षमा कर की झाले ...

चुकले की क्षमा मागायची... इतकी महत्वाची गोष्ट, संस्कार आजीने सांगितला...

तशी साधीच घटना...पण महाशिवरात्रीला

हमखास आठवण येणारी... इतक्या वर्षांनंतरही...

जगणं आणि मरण... या मधे असणारं आयुष्य

रमत गमत... आनंदात , दुःखात घालवत असतांना

वयाच्या वेगवेगळया वळणावरील काही घटना मस्त

आठवणीत रहातात...

आणि क्षणभर का होईना क्षणातच...

त्या त्या वयात नेऊन ठेवतात, घटना आनंददायक असो दुःखदायक कोणताही तणाव नाहीसे करण्याचे सामर्थ्य

जगत असतांना मरणाच्या शेवटच्या श्वासापर्यंत...

# क्रांतीकारक, विचारवंत आणि साहित्यिक - शिव वर्मा

**ज्योतिर्मय साहित्य**

स्वातंत्र्यलढ्यात शिव वर्मा या स्वातंत्र्ययोध्दयाचे नाव इतिहासात नोंदले गेलेले आहे. शिव वर्मा हे एक क्रांतीकारक, विचारवंत आणि साहित्यिक होते. ज्यांनी केवळ ब्रिटीश सत्तेविरोधातच नव्हे तर, विचारांच्या पातळीवरही मोठं युद्ध लढलं. ते भारतीय क्रांतीकारक परंपरेतील धैर्यशील, तत्त्वनिष्ठ आणि वैचारिक बलशाली व्यक्तिमत्व म्हणून आजही आदराने स्मरले जातात. ते भारतातील शेवटचे जगलेले लाहोर कट खटल्यातील सर्वांना माहिती देणारे साक्षीदार होते. त्यांच जीवन म्हणजे विचारांची प्रामाणिकता, त्यागाची ठाम वृत्ती, आणि क्रांतीच्या स्वप्नांसाठी अखंड समर्पण होय. लाहोर कट रचनेचा निकाल ७ ऑक्टोबर १९३० रोजी लागला. लाहोर केसमधील शिव वर्मा हे जन्मठेपेची शिक्षा झालेल्या क्रांतीकारकांपैकी एक होते. १३ मे १९२९ रोजी शिव वर्मा यांना डॉ. गया प्रसाद आणि जयदेव कपूर यांच्यासह सहारनपुर बॉम्ब कारखान्यात अटक करण्यात आली. सहाय्यक पोलिस अधीक्षक जेम्स सॉन्डर्सचा खून करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून तसेच मध्यवर्ती कायदेमंडळात बॉम्ब फ ेकण्याच्या कटात सहभागी असल्याबद्दल धरपकड करण्यात आली. भगतसिंग व बटुकेश्वर दत्त हे मध्यवर्ती कायदे मंडळात बॉम्ब फेकला तेंव्हाच पकडले गेले होते. त्यानंतर सुखदेव, राजगुरु, जितेंद्र संन्याल, अजयकुमार घोष वगैरे अनेक जणांना पकडण्यात आले. चंद्रशेखर आझाद आणि यशपाल सापडले नसल्याने त्यांना फरारी म्हणून जाहीर करण्यात आले. पकडलेल्या क्रांतीकारकांत जतींद्रनाथ दास हेही होते. या सर्व आरोपींना लाहोरच्या मध्यवर्ती तुरूंगात ठेवण्यात आले आणि त्यांच्यावर सॉन्डर्सचा खून करणे, दहशतवादी कृत्ये करणे, बॉम्ब तयार करणे आणि त्याचा वापर करणे या आरोपांवरून खटला भरण्यात आला. सॉन्डर्स खून खटला किंवा लाहोर कट खटला म्हणून हा खटला गाजला. जन्मठेपेची शिक्षा ठोठावल्यानंतर शिव वर्मा यांना आंध्र प्रदेशातील राजमुद्री जिल्हा कारागृहात पाठविण्यात आले. या कारागृहात पाठविण्यापूर्वी त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना विनंती करून भगतसिंग, सुखदेव थापर आणि शिवराम राजगुरु यांची शेवटची भेट घेतली. निघताना शिववर्मा यांचे डोळे अश्रुंनी भरले. तेंव्हा भगतसिंग



म्हणाले.. . ‘‘शिव, भावनिक होण्याची ही वेळ नाही. काही दिवसांत मी सर्व अडचणींपासून मुक्त होईन. परंतु तुम्हा सर्वांना एक लांब कठीण प्रवास करावा लागेल. मला खात्री आहे की जबाबदारीचे मोठे ओझे असूनही, तुम्ही या दीर्घ मोहिमेत थकणार नाही आणि तुम्ही हार मानण्याइतके निराश होणार नाही.‘‘ राजमुंद्री जिल्हा कारागृहात शिव वर्मा यांना प्रथम चंद्रशेखर आझाद आणि नंतर भगतसिंग, सुखदेव थापर आणि शिवराम राजगुरू यांच्या मृत्यूची माहिती मिळाली. नंतर त्यांना अंदमान बेटावर काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी पाठविण्यात आले. १९३३ मध्ये कैद्यांना, विशेषतः राजकीय कैद्यांना दिल्या जाणाऱ्या अमानुष आणि अन्याय्य वागणुकीच्या निषेधार्थ शिव वर्मा यांनी उपोषणात भाग घेतला. या उपोषणादरम्यान त्यांचे हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना या संघटनेचे सहकारी महावीर सिंग यांचे निधन झाले. इतर मृतांमध्ये मोहित मैत्र आणि मनकृष्ण नाबादास यांचा समावेश होता. ब्रिटीश अधिकारी यांनी अखेर स्वातंत्र्ययोध्दयांची माफी मागितली आणि शरीर स्वच्छ करण्यासाठी साबण, झोपण्यासाठी




बेड, खाण्यासाठी खाण्यायोग्य अन्न या मागण्या मान्य केल्या. तसेच राजकीय कैद्यांसाठी पुस्तके व अभ्यास करण्यासाठी परवानगी व एकमेकांशी संवाद साधण्याची परवानगी दिली. हळूहळू तुरूंगाच्या आवारात शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. कैद्यांनी सतीश पाक्राशी, शिव वर्मा आणि भूपाळ बोस यांच्याकडून राज्यशास्त्र आणि इतिहासाचा अभ्यास शिकून घेतला. १९३७ मध्ये शिव वर्मा आणि हरे कृष्ण कोनार यांच्या नेतृत्वाखाली अंदमान जेलमधील काळ्या पाण्याची शिक्षा रद्द होण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी ३६ दिवसांचे पुन्हा उपोषण केले. या उपोषणाला ब्रिटीश शासन घाबरले आणि त्यांनी सप्टेंबर १९३७ मध्ये शिव वर्मा आणि इतरांना भारतात कैद भोगण्यासाठी पाठविले. अखेर शिव वर्मा यांची १९४६ मध्ये कैदेतून सूटका करण्यात आली.

(क्रमशः)

# श्रीयश अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** - श्रीयश प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयातील एकूण २५ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. साई इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्सच्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंगच्या किरण डीके आणि रवी इंगळे यांची प्रोजेक्ट इंजिनिअर म्हणून निवड झाली आहे. ई.टी.सी. विभागातून वसीम पठाण तसेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या बाबासाहेब झाल्टे, रितेश राठोड, बोधिरत्न भारणे आणि राणी ढगे यांचीही यांची प्रोजेक्ट मॅनेजर पदासाठी निवड झाली.

महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिक महावितरण कंपनीमध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या केशव खरात याची निवड झाली असून, हे एक शासकीय नौकरीमध्ये संधी मिळणे मोठे यश मानले जात आहे. अलंकार इंजिनीरिंग



एक्यूपमेन्ट ली.मध्ये चार मेकॅनिकलच्या विद्यार्थ्यांची निवड झाली.

फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही यशाचे नवीन शिखर गाठले आहे. श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च मधील प्रियंका खरात, रुचाली वाघ, गणेश रासे, पल्लवी खिल्लारे, पुरुषोत्तम गाढे, श्रीकृष्ण खेडकर, श्रुती काक, कैलास करपे आणि वैभवी राऊत या नऊ विद्यार्थ्यांची उत्पादन विभागासाठी मायलान लॅब्स ली. मध्ये निवड झाली आहे. कन्सेप्ट फार्मा या कंपनीत कॅम्पस मुलाखतीद्वारे रोहन सपकाळ आणि जान्हवी शेलार या विद्यार्थ्यांचीही उत्पादन विभागात निवड झाली आहे. तसेच, नम्रता सुरडकर आणि शंतनू येंचेवाड यांची निवड ए.बी.व्ही. थेरप्युटिक इंडिया प्रा. लि., मुंबई या कंपनीत झाली आहे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी रोहिणी खुडे हिने गॅट-बी परीक्षा उत्तीर्ण केली. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी या यशाबद्दल सेंट्रल टीपीसी, प्राचार्य, शिक्षक आणि सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ‘‘राम कृष्ण हरी‘‘ जपाचे महत्त्व

**ज्योतिर्मय साहित्य**



१. मनाची शांती: ‘‘राम कृष्ण हरी‘‘ या नामस्मरणामुळे मन स्थिर होते आणि चिंता, अस्वस्थता कमी होते.

२. सात्त्विकता वाढवते: हा जप सात्त्विक वृत्ती वाढवतो व जीवनात शुद्धता येते.

३. भक्तिभाव वृद्धिंगत होतो: भगवान श्रीराम, श्रीकृष्ण व श्रीहरी यांची स्मृती ठेवून भक्तीचा विकास होतो.

४. नामस्मरणाचे पुण्य: या जपाने पुण्यसंचय होतो आणि पापक्षय घडतो.

५. ध्यानात मदत: हा जप नियमित केल्यास ध्यान, आत्मपरीक्षण व अंतर्मुखता सोपी होते.

६. दुःखांतून मुक्ती: ‘‘राम कृष्ण हरी‘‘ हे नाम उच्चारल्याने दुःखं हलकी होतात आणि मानसिक बळ मिळते.

७. संतांचा मार्ग: अनेक संतांनी हा मार्ग सांगितला आहे. या नामाचा आग्रह केला आहे.

८. स्मरण सोपे व प्रभावी: हे तीन शब्द ‘राम’, ‘कृष्ण’, ‘हरी’ सर्वसामान्यालाही सहज जपत येतात.

९. सकारात्मक ऊर्जा मिळते: हा जप केल्याने वातावरणात सकारात्मकता पसरते.

१०. मोक्षमार्ग साधतो: संत साहित्यात सांगितले आहे की नामस्मरण हाच खरा मोक्षाचा मार्ग आहे.

अर्थात

‘‘राम कृष्ण हरी‘‘ या त्रिवेणी नामात भक्ती, शक्ती आणि मुक्ती तीनही प्राप्त होतात.


# विद्यार्थी विकास ; शिक्षकांची मेहनत गरजेची?

**ज्योतिर्मय साहित्य**

पर्यायानं सांगायचं झाल्यास आपल्या विद्यार्थ्यातही असेच सुप्त गुण असतात. त्या सुप्त गुणांवर कोणत्याच दुर्वास नावाच्या शिक्षकानं शाप देण्याची गरज नाही की आपल्या विद्यार्थ्यातील हनुमंत ती शक्ती विसरेल. ज्याला सीतेचा शोध लावता येणार नाही. या ठिकाणी सीतेचा शोध म्हणजे एखाअःआ नाविन्यपूर्ण शोध असा आहे. तो शोध आहे की ज्यातून वस्तूनिर्मिती होईल व ती वस्तुनिर्मिती देशाला महासत्ता बनविण्याच्या कामी येईल. या दृष्टीनं आपल्यासाठी नाही तर आपल्या विद्यार्थ्यांसाठी आकारिक मूल्यमापनाची गरज आहे.

बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २९ तसेच २० ऑगस्ट २०१० च्या शासननिर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाचे सर्वच पैलू:चे सातत्याने व विविध अंगाने मूल्यमापन करणे. हेच आकारिक मूल्यमापन होय. अन् त्यासाठी वापरावयाची कार्यपद्धती म्हणजे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन होय. यात आकारिक मूल्यमापन पद्धतीत दैनिक निरीक्षण, तोंडीकाम, प्रयोग, प्रात्यक्षिक, उपक्रम, कृती, प्रकल्प, चाचणी, स्वाध्याय, वर्गकार्य, प्रश्नावली. या सर्वांचा समावेश होतो. ज्यातून आपल्याला सुप्तगुण पाहायला मिळू शकतात व ते सुप्तगुण वाढविण्यास वाव मिळू शकतो. सुप्तगुण हे सर्वच विद्यार्थ्यात असतात. सुप्तगुण म्हणजू वाचन व लेखन येणे नाही. तर चांगले बोलता येणे, ज्यातून वक्ता तयार होवू शकतो. गाणे म्हणता येणे. ज्यातून संगीतकला वाढीस लागते. वाद्य वाजवता येणे, ज्यातून वादनकला वाढीस लागते. कोणाला भांडे बनवता येणे, ज्यातून कल्पकता वाढीस लागते, शोधक वृत्ती वाढीस लागते व शोध लावता येवू शकतो आणि सर्वात महत्वाचं म्हणजे, चित्र काढता येणे व लिहिता येणे. ज्यातून चित्रकार व लेखक बनवता येवू शकतं.

संकलित मूल्यमापन पद्धतीपेक्षा आकारिक मूल्यमापन पद्धती अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कारण याच पद्धतीतून विद्यार्थ्यांचं व्यक्तिमत्त्व घडवता येतं. आकारिक मूल्यमापन ही एक साचेबंद पद्धती नाही. ती पद्धती मुक्त पद्धती आहे. ज्यातून विद्यार्थ्याचं व्यक्तीमत्व घडवता येतं. त्यात बदलाव करता येतो आणि तो बदलाव दररोजच करता येतो. तो दैनिक निरीक्षणातून करता येतो. परंतु आतापर्यंत आपण संकलित मूल्यमापन करत आलोय. ज्यातून वर्षभरात किंवा दर सहामाहीला मूल्यमापन होत होतं. ज्यातून विद्यार्थ्यात असलेले सुप्तगुण दिसत नव्हते. ते वाढविताही येत नव्हते. फक्त एक आढावा पाहायला मिळत होता. ज्यातून दिशाही व्यवस्थित स्पष्ट होत नव्हती. मात्र आज आकारिक मूल्यमापन आलं असलं तरी डरेचसे शिक्षक आकारिक मूल्यमापन बरोबर करीत नाहीत. नोंदीही बरोबर घेतल्या जात नाहीत. नोंदी घ्यायच्या असेल तर विचार येतो. विचार येतो की कोण्या प्रकारच्या नोंदी घ्याव्यात. मग शिक्षक नोंदींच्या पुस्तका पाहतात. त्याच नोंदी घेतात. ज्या आपल्या विद्यार्थ्यांच्या नसतात. ज्या इतरांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांओअया घेतलेल्या असतात. ज्यातून आपल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीतील चुकीच्या नोंदी घेतल्या जातात. ज्या नोंदींतून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्तगुण वाढीस लागत नाहीत.





महत्वपूर्ण बाब ही की जर आपल्याला वाटत असेल की आपलाही विद्यार्थी घडावा. त्याच्या घडण्यातून शास्त्रज्ञ तयार व्हावा. त्यानंही एखादा शोध लावावा. त्याचाही हातभार भारताच्या महासत्ता बनण्यात व्हावा तर त्याच्या सुप्तगुणांच्या नोंदी या सत्य व व्यवस्थित व्हायलाच हव्यात. जेणेकरुन त्याच नोंदींच्या अनुषंगातून देशाचा भावी नागरिक हा परिपूर्ण स्वरुपाचा तयार होईल. जेणेकरुन देशाचा विकास होवू शकेल व देशाला महासत्ताही नक्कीच बनवता येवू शकेल. त्यासाठी शिक्षकांना खरी मेहनत घेणं गरजेचं आहे. हे तेवढंच खरं. ज्यात काही अपवादात्मक शिक्षक सोडले तर बरेचसे शिक्षक मेहनत घेत असतात यात शंका नाही.


# पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली

**ज्योतिर्मय साहित्य**

आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज डॉ सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ सलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए



ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिंन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559